**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात देशाच्या संरक्षण खात्याचा कायापालट झाला असल्याचं संरक्षणमंत्र्यांचं प्रतिपादन

- ऑपरेशन सिंदूरनंतर विविध देशांना भेटी देऊन भारताची भूमिका मांडणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळांमधल्या सदस्यांची भेट आज प्रधानमंत्री घेणार

- भांडवली बाजारातून निधी उभारणारी देशातली पहिली महानगरपालिका ठरली पिंपरी चिंचवड

- ऑक्सियम-4 मोहीम प्रतिकूल हवामानामुळे एका दिवस लांबणीवर.

**आणि**

- भारताचा माजी क्रिकेट कर्णधार महेंद्रसिंह धोनी आयसीसीच्या हॉल ऑफ फेम मधे विराजमान

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात देशाच्या संरक्षण खात्याचा कायापालट झाला असल्याचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी म्हटलं आहे. मजबूत सीमा, अद्ययावत सेनादलं, देशातच तयार झालेली शस्त्रास्त्रं, संरक्षण उत्पादनांची विक्रमी निर्यात, जागतिक स्तरावर अधिक विश्वास, आणि आत्मनिर्भरतेकडे वाटचाल या शब्दांमधे राजनाथ सिंग यांनी संरक्षण क्षेत्राच्या गेल्या ११ वर्षातल्या वाटचालीचं वर्णन केलं आहे. संरक्षण क्षेत्रातल्या वाटचालीचा संक्षिप्त आढावा आता ऐकूया....

***होल्ड व्हाईस कास्ट***

*(देशाची संरक्षण उत्पादन निर्यात २०१४-१५ मधे १ हजार ९४१ कोटी होती ती २०२४-२५ या वर्षात २३ हजार ६६२ कोटी रुपये झाली. त्यापूर्वी संरक्षण विभागाला शस्त्रास्त्रं आणि इतर उत्पादनांसाठी इतर देशांवर अवलंबून रहावं लागत होतं. मात्र*

*आत्मनिर्भर भारत आणि मेक इन इंडिया मुळे भारताची संरक्षण उत्पादन निर्यात विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. १०० हून अधिक देशांना भारताकडून संरक्षण उत्पादनं निर्यात केली जातात. एलसीएच प्रचंड, तेजस लढाऊविमानं, ब्राह्मोस क्षेपणास्त्र, अशा विविध देशांतर्गत उत्पादनांमुळे संरक्षणाची मजबूत फळी उभारली गेली आहे. त्याचप्रमाणे परदेशी गुंतवणुकीचा ओघही वाढता राहिला आहे. ११ वर्षांच्या रक्षाशक्ती कालावधीत ताकद, आत्मनिर्भरता, आणि जागतिक नेतेपदाकडे भारताची वाटचाल होत आहे. )*

गेल्या ११ वर्षांत देशाच्या संरक्षण क्षेत्रात लक्षणीय बदल झाल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. देशानं आधुनिकीकरण आणि संरक्षण उत्पादनाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यावर लक्ष केंद्रित केलं आहे. देशाचे नागरीक आपल्या देशाला अधिक मजबूत बनवण्याचा संकल्प घेऊन एकत्र आल्याचं पाहून आनंद होत असल्याचं मोदी यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षांत भारताने लक्षणीय विकास आणि सुशासन अनुभवल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन यांनी केलं आहे. ते आज रालोआ सरकारच्या ११ वर्षांच्या पूर्ततेनिमित्त पुद्दुचेरी इथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. जो देश भ्रष्टाचार आणि कमकुवत प्रशासनाच्या युगात अडकला होता, त्या देशाला पारदर्शक आणि लोककेंद्री प्रशासनाच्या युगात नेण्याची कामगिरी गेल्या ११ वर्षांत सरकारने केल्याचं ते म्हणाले. भारत आता जगातली चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला असून २७ कोटी लोकांना गरिबीतून बाहेर काढण्यात आलं आहे. सरकारने महिला सबलीकरण, शेतकऱ्यांचं कल्याण आणि दारिद्र्य निर्मूलनाला प्राधान्य दिलं आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू आणि काश्मीरमधला विकास, ऑपरेशन सिंदूरमध्ये स्वदेशी बनावटीच्या संरक्षण तंत्रज्ञानाचा यशस्वी वापर आणि नक्षलवादी कारवायांमध्ये झालेली लक्षणीय घट ही रालोआ सरकारची प्रमुख कामगिरी असल्याचंही मुरुगन यांनी नमूद केलं.

**<><><><><>**

ऑपरेशन सिंदूर बाबत जगभरातल्या महत्त्वाच्या देशांना भेटी देऊन भारताची भूमिका मांडणाऱ्या सर्वपक्षीय शिष्टमंडळांमधल्या सदस्यांची आज प्रधानमंत्री नरेंद्र मोदी भेट घेणार आहेत. वृत्तसंस्थेच्या बातमीत ही माहिती दिली आहे. या मोहिमेबाबत चर्चा करण्यासाठी ही भेट होणार असून, संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांच्या कार्यालयानं या सदस्यांना आज संध्याकाळी सात वाजता प्रधानमंत्र्यांच्या निवासस्थानी ही भेट होणार असल्याचं कळवलं आहे. दरम्यान, शशी थरुर यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचं आज मायदेशी आगमन होणार आहे.

**<><><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आपल्या स्वित्झर्लंड दौऱ्यात भारत आणि युरोपीयन मुक्त व्यापार संघटनेच्या व्यापार आणि आर्थिक भागीदारी करारावरच्या चर्चेत भाग घेतला. या करारामुळे भारत आणि स्वित्झर्लंड दरम्यान व्यापार आणि गुंतवणूकीच्या संधी, भागीदारी आणि नव्या शक्यता यावर चर्चा झाल्याचं गोयल यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. आईसलॅंड, लिकटेंस्टीन, नॉर्वे आणि स्वित्झर्लंड या युरोपीयन मुक्त व्यापार संघातल्या ४ देशांबरोबरचा मुक्त व्यापार करार सप्टेंबरपासून लागू होणार असल्याचं गोयल यांनी यापूर्वी सांगितलं होतं.

सर्वात जलद गतीनं वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून जग भारताचा केवळ सन्मान करत नाही तर भारताच्या व्यापार सुलभीकरणाच्या दृष्टिकोनाची प्रशंसा करत असल्याचं गोयल यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

'देशातील तरुणाईमध्ये असलेली प्रतिभा आणि तंत्रज्ञानातला नवोन्मेष यांच्या सामर्थ्यावर भारत समकालीन आव्हानांना सामोरं जात आंतरराष्ट्रीय नेतृत्व म्हणून उभा राहात आहे', असं लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी म्हटलं आहे. ते काल

आयआयटी जोधपूर इथं बोलत होते. बिर्ला यांनी समाज, अर्थव्यवस्था आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीत युवकांच्या योगदानाचा गौरव केला.

**<><><><><>**

भारताचे अंतराळवीर शुभांशु शुक्ला यांना अंतराळात घेऊन जाणारी ऑक्सियम-4 मोहिम शुभारंभ प्रतिकूल हवामानामुळे एका दिवसानं पुढे ढकलण्यात आली आहे. इस्रोचे अध्यक्ष व्ही. नारायणन यांनी दिलेल्या माहितीनुसार, या उड्डाणाची नियोजित वेळ आंतरराष्ट्रीय प्रमाणवेळेनुसार आज संध्याकाळी साडेपाच होती. ही ऐतिहासिक मोहीम अमेरिका, भारत, पोलंड आणि हंगेरी या देशांच्या चार अंतराळवीरांना १४ दिवसांच्या वैज्ञानिक मोहिमेसाठी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर घेऊन जाणार आहे. ऑक्सियम-4 (AX-4) मोहिमेत भारतातील शुभांशु शुक्ला यांच्यासह पोलंडमधील स्लावोज़ उझ्नांस्की, हंगेरीमधील तिबॉर कपु आणि अमेरिकेतील पेगी व्हिटसन यांचा या मोहिमेत समावेश आहे. अंतराळवीर ३१ देशांमधून सुमारे ६० वैज्ञानिक प्रकल्पाचा अभ्यास करणार आहेत. त्यामध्ये इस्रोच्या नेतृत्वाखाली काही महत्त्वाचे संशोधन प्रकल्प आहेत.

**<><><><><>**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका भांडवली बाजारातून निधी उभारणारी देशातली पहिली महानगरपालिका ठरल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा हरित कर्जरोखे लिस्टिंग कार्यक्रम मुंबई इथं मुंबई शेअर बाजाराच्या सभागृहात आज झाला तेव्हा ते बोलत होते. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने जारी केलेल्या हरित कर्जरोख्यांना जनतेकडून चांगला प्रतिसाद मिळाला. कर्जरोखे जारी झाल्यानंतर काही मिनिटातच शंभर कोटींची गुंतवणूक झाली. यावरून हरित कर्जरोख्यांवरचा गुंतवणूकदारांचा विश्वास दिसतो, असं फडणवीस म्हणाले. केंद्र सरकारकडूनही २० कोटींचं प्रोत्साहनपर अनुदान महानगरपालिकेला मिळाल्याचं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

या कार्यक्रमाला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त शेखर सिंह उपस्थित होते.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती आयोगाला वैधानिक दर्जा देण्यासंबंधी विधेयक आगामी विधिमंडळ अधिवेशनात आणण्याचा निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. शासकीय भौतिकोपचार आणि व्यवसायोपचार पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ६ हजार २५० रुपयांची वाढ, पदव्युत्तर पदवी विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात १० हजार रुपयांची वाढ, तसंच बी.एस्सी. नर्सिंग अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या विद्यावेतनात ८ हजार रुपयांची  वाढ करण्याचा निर्णयही आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाला.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद-आयसीसीनं क्रिकेटपटू महेंद्रसिंह धोनीला आयसीसीच्या प्रतिष्ठेच्या हॉल ऑफ फेम मध्ये समाविष्ट केलं आहे. या वर्षी हा सन्मान मिळवणाऱ्या सात खेळाडूंमध्ये धोनीचा समावेश आहे. कठीण परिस्थितीत असामान्य नेतृत्व करण्याची क्षमता आणि खेळातलं अद्भुत कौशल्य यासाठी धोनीची निवड या सन्मानासाठी केल्याचं आयसीसीनं म्हटलं आहे. आयसीसीच्या हॉल ऑफ फेममध्ये समाविष्ट होणं, ही आपल्यासाठी सन्मानाची बाब असल्याची प्रतिक्रिया महेंद्रसिंह धोनीनं दिली आहे.

**<><><><><>**

बेंगळुरू इथे चिन्नास्वामी स्टेडियमबाहेर झालेल्या चेंगराचेंगरी प्रकरणी आज कर्नाटक उच्च न्यायालयाने राज्य सरकारला आपलं उत्तर सीलबंद लिफाफ्यात सादर करण्याची परवानगी दिली. या प्रकरणी आपणाहून दाखल याचिकेवर प्रभारी मुख्य न्यायाधीश न्यायमूर्ती व्ही. कामेश्वर राव आणि सी. एम. जोशी यांच्या

पीठासमोर सुनावणी झाली. यापूर्वी न्यायालयाने सरकारला या दुर्घटनेमागची कारणं शोधण्याची तसंच भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी नोटीस बजावली होती. गेल्या आठवड्यात झालेल्या या दुर्घटनेत ११ जणांचा मृत्यू झाला होता तर ३० हून अधिक जण जखमी झाले.

//<><><><><>//